**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१**

सन २००८-२००९

विषय क्रमांक- १ मंगळवार दिनांक- ८/४/२००८

ठराव क्रमांक -१ मंगळवार दिनांक-८/४/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक १८ मंगळवार दिनांक २५/३/२००८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकूर** :- मा.स्थायी समिती सभा क्रमांक १८ मंगळवार दिनांक २५/३/२००८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे साठी मा.स्थायी समिती सभे पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- मागील सभा दिनांक २५/३/२००८रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे आहे. मा.सदस्यांनी त्याबाबत आपल्या सुचना,दुरूस्त्या सांगाव्यात .

मा.श्री. शिंदे द.बा. :- कार्यवृत्त मंजूर करावे.

मा.सौ. खरपुडे ज.सु. :- मागिल सभेचे कार्यवृत्त मंजूर करावे.

मा.सभापती साहेब :- मागील सभा दिनांक २५/३/२००८रोजीच्या सभेचे कार्यवृत्त सर्वानुमते मंजूर करावे.

**ठराव :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक १८ मंगळवार दिनांक २५/३/२००८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक :- मा.श्री. शिंदे दशरथ बाबु

अनुमोदक :- मा.सौ. खरपुडे जयश्री सुरेश

ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :- १**
**सन २००८-२००९**

विषय क्रमांक :२ मंगळवार दिनांक ८/४/२००८

ठराव क्रमांक :-२ मंगळवार दिनांक ८/४/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४३९ चे तरतूदीनुसार श्रीमती अमिनाबी शेख यांच्या मालकीच्या इमामवाडा, टिळकरोड येथील हजारी गादी कारखान्याचा परवाना रद्द करणे बाबत ऑफीस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** प्रस्तावना -विषय - श्रीमती अमिना बी शेख यांच्या मालकीच्या इमामवाडा टिळक रोड येथील हजारी गादी कारखान्याचा परवाना रद्य करणे बाबत.

उपरोक्त विषयानुसार श्रीमती अमिना बी.शेख इस्माईल यांच्या मालकीच्या हजारी गादी कारखाना (कापूस पिंजाई)परवाना रद्य करणे बाबत सदर भागातील नागरिकांच्या वारंवार प्राप्त झालेल्या तक्रारीनुसार,संबधित व्यवसाय धारक यांनी उल्लंघन केल्याचे निदर्शनास आल्यानुसार म.न.पा. नगररचनाकार यांचे जा.क्र. १६२८ दि.२४/८/०७ ने ना -हरकत प्रमाण पत्र रद्य केले बाबत तसेच म.प्र.वि. मंडळ यांनी सदर व्यवसाय धारकांचे वस्तुस्थिती पाहुन समंती पत्र रद्य केले नुसार संपूर्ण प्रकरण प्रस्ताव सह म.न.पा. अधिनियम १९४९ चे कलम ४३९ पॅरा ४ पॅरा ५ चे संक्रमन कालीन तरतुदीनुसार तत्कालीन नगरपरिषदेच्या अ‍ॅक्ट १९६५ मधील कलम २८१ (२) अ अन्वये परवाना घेवून नुतनीकरण न केले बाबत तसेच कलम २८० प्रमाणे उपविधीमधील कलम ८ प्रमाणे गादी कारखान्याचा परवाना रद्य करणे बाबत सदर प्रकरणा बाबत विधी सल्लागार यांचे मतानुसार व मा.आयुक्त साहेब यांचे मान्यतेने मा.स्थायी समितीपुढे निर्णयास्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचा दिनांक ५/१२/२००७ रोजीचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- सदरचे व्यवसायाचे नाहरकत प्रमाणपत्र प्रदुशन नियंत्रण मंडळाने रद्द केलेले आहे.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- त्यांचा ना हरकत दाखला पदुशन नियंत्रण मंडळाने रद्द केलेला असून व्यवसाय बंद करणे बाबत नागरिकांच्या तक्रारी नुसार प्रस्ताव सादर केलेला आहे.

मा.सौ. दिघे वि.रा. :- व्यवसायाचे मालक यांना सभेमध्ये चर्चे करिता बोलावले होते ते आलेले नाहीत.

मा.श्री. शेख आरिफ शे.र.:- संबंधीतांशी चर्चा केली होती.

मा.श्री. शिंदे द.बा. :- त्यांना NOC मिळत नाही त्यामुळे त्यांचा परवाना रद्द करणेची कार्यवाही करावी.

मा.सौ. खरपुडे ज.सु. :- ऑफिस रिपोर्टानुसार परवाना रद्द करणेस मंजूरी द्यावी ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब:-सदर व्यावसायाच्या परवाना सर्वानुमते रद्द करणेस मंजूरी देण्यांत यावी.ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

**ठराव** :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४३९ चे तरतूदीनुसार श्रीमती अमिनाबी शेख यांच्या मालकीच्या इमामवाडा, टिळकरोड येथील हजारी गादी कारखान्याचा परवाना रद्द करणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. शिंदे दशरथ बाबु.

अनुमोदक :- मा.सौ.खरपुडे जयश्री सुरेश

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :- १**
सन २००८-२००९

विषय क्रमांक-३ मंगळवार दिनांक ८/४/२००८

ठराव क्रमांक -३ मंगळवार दिनांक ८/४/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक २ सावेडी भागातील संत निरंकारी भवना समोरील ओपन स्पेसला कंपाउन्ड करणे कमी मागविण्यात आलेल्या कमीचे निविदा दरास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** प्रस्तावना-विषय- प्र.क्र. २ सावेडी संत निरंकारी भवनासमोरील ओपन स्पेसला कम्पांउड करणे.

उपरोक्त विषयान्वये सावेडी येथील ओपन स्पेस ( संत निरंकारी भवन समोर) हा विविध खेळ व जॉगींग ट्रॅक या मुळे या परिसरातील लहान मुले व प्रौढ नागरिक यांचा दैनंदिन वापर असतो. तेथे सध्या संरक्षक भिंत नसल्यामुळे पाळीव प्राणी, मोकाट जनावरे यांच्यामुळे जॉगींग ट्रॅकचे नुकसान होत आहे. हा परिसर संरक्षक भिंती शिवाय योग्य प्रकारे सुरक्षित होणार नाही.

सदर ओपन स्पेस मध्ये संरक्षक भिंत, वॉचमन केबीन, पाण्याचा हौद, बोअर पंप व संरक्षक भिंतीच्या आतुन छोटी फुल व झाडे व बोहरून उंच शोभेचे झाडे लावल्यास हा परिसर अत्यंत रमनीय व सुरक्षित होईल. जेणे करून जॉगींग ट्रॅकचे होणारे नुकसान मोकाट जनावारांचा उपद्रव टाळता येणे शक्य होईल. तसेच कायमस्वरूपी वॉचमनची व्यवस्था केल्यास निर्माण होणारे गॉर्डन ( निसर्ग) योग्य प्रकारे काळजी व व्यवस्था राखणे शक्य होईल. सदरचे काम करणे बाबत मा. उपमहापौर श्री. दिपक सुळ यांनी दि. २४/४/०७ रोजी यादी देउन मागणी केलेली आहे.

त्यामुळे सदरचे कामाचे सविस्तर अंदाजपत्रक सन २००६-०७ चे दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून सदर कामास एकूण रक्कम रू. ९,९४,२७३/- इतका खर्च अपेक्षीत आहे. सदरचा खर्च हा नविन उदयान विकास या लेखाशिर्षाखाली म.न.पा. फंडातून करावे लागणार आहे. तरी सदरच्या प्रस्तावास मा.आयुक्त साहेब यांनी दि. १९/७/०७ रोजी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. सदर कामाची निविदा मागविण्यांत आली असून निविदा भरतांना सबंधीत ठेकेदार श्री.विजय म्हस्के यांनी निविदे मध्ये २५% जादा दराने काम मंजूर करणेस दि.२१/११/०७ रोजी कळविले होते.

सुधारित देयकानुसार होणारी कामाची किंमत रू. ११,४८,८७४/- येत आहे व चालू दरसुची सन २००७-०८ अनुसार कामाची अद्यावत किंमत रू. ११,८३,६५८/- येत असुन ठेकेदाराची सुधारित किंमत व कामाची अद्यावत किंमत या मधील फरक रू. ३४७८४/- (३.०३% कमी) येत असल्याने सदरचा प्रस्ताव दि. २८/१२/०७ रोजीच्या छाननी समितीमध्ये सदर काम सन २००७-०८ चे दरसुचीशी तुलणा करता ३.०३% कमी येत असल्याने छाननी समिती कडून सदर काम निविदा धारकास निविदा दरापेक्षा दरापेक्षा २५% जादा दराने देणेची शिफारास करण्यात आलेली असून स्थायी समिती चे मंजूरी साठी पाठविणे करिता मा.आयुक्त साहेब यांनी दि. २८/२/०८ अन्वये मान्यता दिलेली आहे.

तरी सदरची निविदा मा.स्थायी समिती मार्फत प्रशासकीय मंजूरीस्तव सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक २ सावेडी भागातील संत निरंकारी भवना समोरील ओपन स्पेसला कंपाउन्ड करणे कमी मागविण्यात आलेल्या कमीचे निविदा दरास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

हा विषय सभे मध्यें वाचून दाखविला असतां त्यावर सभे मध्येंझालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- संत निरंकारी भवना समोरील ओपन स्पेसला कंपाउन्ड करणेचे कामाचे आलेले दर मंजूरीचा प्रस्ताव आहे.

मा.श्री. शिंदे द.बा. :- कमीचे दर मंजूर करावे.

मा.श्री. कोतकर भा.ए. :- कंपाउन्डचा खर्च किती आहे.

शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी. :- कामाची सुधारित किंमत ११,४८,८७४/- असुन चालू दरसुची नुसार किंमत जादा येत आहे.

मा.सौ. दिघे वि. रा. :- प्रस्ताव मंजूर करावा.

मा.श्री. शिंदे द.बा.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- सर्वानुमते आलेले कमीचे दर मंजूर करावे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

**ठराव** :-अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक २ सावेडी भागातील संत निरंकारी भवना समोरील ओपन स्पेसला कंपाउन्ड करणे कमी मागविण्यात आलेल्या निविदा दराचा तक्ता व ऑफिस रिपोर्ट पहाता छाननी समितीने शिफारस केल्यानुसार तुलणात्मक दृष्टया कमीचे निविदा दरधारक श्री. विजय म्हस्के,अहमदनगर यांचे निविदा दरापेक्षा २५% जादाचे ( सन २००७-२००८ चे दरसुचीशी तुलणा करता ३.०३ % कमीचे दरास) दरास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.
सुचक :- मा.सौ. दिघे विमल रामचंद्र

अनुमोदक :- मा.श्री. शिंदे दशरथ बाबु
ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :- १**
सन २००८-२००९

विषय क्रमांक-४ मंगळवार दिनांक ८/४/२००८

ठराव क्रमांक -४ मंगळवार दिनांक ८/४/२००८

**प्रस्तावाचा विषयः-**अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सावेडी सर्व्हे नं.५५/१ पै.तपोवन रोड येथील म्हाडा चे गृहनिर्माण योजनेकरिता पाणी पुरवठा करणे साठी १५० एम.एम.व्यासाची पाईप लाईन टाकणे कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दरास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर** :- प्रस्तावना-विषय- तपोवन रोड स.नं. ५५/१ सावेडी येथे म्हाडाच्या गृहनिर्माण योजनेस पाणी पुरवठा करणेसाठी १५० एम.एम. व्यासाची जी.आय. पाईप लाईन टाकणे.

तपावेन रोड स.न. ५५/१ सावेडी येथे म्हाडाच्या गृहनिर्माण योजनेस पाणी पुरवठा करणेसाठी १५० एम.एम. व्यासाची जी.आय. पाईप टाकणे बाबत तपावेन रोड वरील जुन्या पिंपळगाव येथून १५० एम.एम. व्यासाची पाईप लाईन टाकावी लागणार असून प्रस्तावीत कनेक्शन पासून म्हाडाच्या साईटपर्यतचे समक्ष मोजमाप घेवून सुमारे ८५० मी. लांबीचे पाईप लाईनचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून अंदाजीत खर्च ९,२९,४८६/- अपेक्षीत आहे.

म्हाडाचे कार्यकारी अभियंता यांचे समवेत दिनांक १६/५/२००६ रोजी मा.आयुक्त साहेब यांचे दालनात झालेल्या बैठकीत ठरल्यानुसार सदर कामासाठी आवश्यक अंदाजपत्रकीय खर्चाच्या ५०% भार म्हाडाने व ५०% भार महानगरपालिकेने उचलावा असे ठरले. त्यानुसार कार्यकारी अभियंता नाशिक गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ यांनी म्हाडाच्या जलवाहिनी टाकणे बाबतच्या कामाच्या ५०% खर्चापोटीची रक्कम रूपये ५,००,०००/-डी.डी.क्र.२०३२१५दिनांक८/१२/२००६अन्वये महानगरपालिके कडे भरले आहे.

सदर कामाचे अंदाजपत्रक सन २००५-२००६ अनुसार करण्यात आले असून सदर कामास एकूण रक्कम रूपये ९,२९,४८६/- इतका खर्च अपेक्षित असून त्यास मा. आयुक्त साहेब यांनी २९/०१/२००७ अन्वये प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. सदर कामाची निविदा मागविणेत आली असून निविदा भरताना संबंधीत ठेकेदार श्री. विजय म्हस्के यांनी निविदेमध्ये ३०% जादा दराने काम करणे बाबत नमूद केले आहे. ठेकेदारास वाटाघाटीसाठी पत्र दिले असता त्यांनी अंदाजपत्रकापेक्षा जादा दर दिला आहे. त्यांनी सदर दर चालू दरसूचीवर अद्यावत पाईपचे दर धरून ४.८२% कमी येत आहे.

उपरोक्त कामाची सन २००६-०७ किंमत रूपये ७,४१,३११/- इतकी येत आहे. त्यानुसार ठेकेदाराचा देकार ४९.०४ % येत आहे. तथापी पाईपच्या संबंधी म.जि.प्रा. करणाची सन २००७-०८ ची दरसूची उपलब्ध झालेली नाही. मार्केटमध्ये पाईपच्या किंमती वाढल्याने भांडर विभागाकडून खरेदी झालेला १५० एम.एम. व्यासाची जी.आय. पाईपचा दर रूपये ११५०/- प्रति मिटर इतका मंजूर झालेला आहे व त्याप्रमाणे भांडार कडून खरेदी करण्यात आलेला आहे. ( पुरवठा आदेश क्र. ५९९/०७ दिनांक २६/१०/२००७) या किंमतीनुसार सदर कामाची किंमत रू.११,६०,७८६/- इतकी होत आहे. या किंमतीच्या अनुषंगाने ठेकेदाराचा देकार ४.८२ % इतका कमी येत आहे. त्यानुसार सदरची निविदा २८/१२/२००७ रोजीच्या छाननी समितीपुढे ठेवली असता सन २००७-०८ चे दरसुचीपेक्षा ४.८२% पेक्षा कमी येत असुन छाननी समितीकडून सदर काम निविदा धारकास ३०% जादा दराने देण्याची शिफारस करण्यात आलेली असून स्थायी समितीचे मंजूरीसाठी पाठविणेकरीता मा.आयुक्त साहेब यांनी दि. २८/०२/२००८ अन्वये मान्यता दिलेली आहे.

तरी सदरची निविदा मा.स्थायी समिती मार्फत प्रशासकीय मंजूरीस्तव सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषयः-**अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सावेडी सर्व्हे नं.५५/१ पै.तपोवन रोड येथील म्हाडा चे गृहनिर्माण योजनेकरिता पाणी पुरवठा करणे साठी १५० एम.एम.व्यासाची पाईप लाईन टाकणे कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दरास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा .

मा.सभापती साहेब :- तपोवन रोड येथील म्हाडाचे गृहनिर्माण योजने करिता पाणी पुरवठयासाठी पाईप लाईन टाकणेचे कामाचे आलेले दर मंजूरीचा प्रस्ताव आहे.

मा.श्री. कोतकर भा.ए. :- किती खर्चाची योजना आहे.

शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी. :- उपरोक्त कामाची सन २००६-२००७ चे दरसुची नुसार रू. ७,४१,३११/- चे एस्टीमेंट तयार केले होते.मनपाचे भांडार विभागाने पुरवठा आदेश क्र. ५९९/०७ दि. २६/१०/२००७ चे किंमती नुसार सदर कामाची रू. ११,६०,७८६/- किंमत होत असुन या किंमती च्या अनुषगांने कमीचे निविदाकार यांचा देकार ४.८२ % इतका कमी येत आहे. छाननी समितीने सदर काम ३०% जादा दराने देण्यांस मंजूरी देणे विषयी शिफारस केलेली आहे.

मा.श्री. कोतकर भा.ए.:- ऑफिस रिपोर्टानुसार कमीचे दर मंजूर.

मा.सौ. पवार स.बा. :- ऑफिस रिपोर्टानुसार कमीचे दरास मंजूरी द्यावी.

मा.श्री. शिंदे द.बा .:- आलेले कमीचे दर मंजूर करावे.

मा.सभापती साहेबः- सर्वानुमते छाननी समितीने शिफारस केल्यानुसार कमीचे दरास मंजूरी द्यावी ऑफिस रिपोर्ट मंजूर

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सावेडी सर्व्हे नं.५५/१ पै.तपोवन रोड येथील म्हाडा चे गृहनिर्माण योजनेकरिता पाणी पुरवठा करणे साठी १५० एम.एम.व्यासाची पाईप लाईन टाकणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तक्ता व त्यावरील ऑफिस रिपोर्ट पहाता छाननी समितीने शिफारस केल्या नुसार कमीचे निविदा दर धारक श्री. विजय म्हस्के,अहमदनगर यांचे निविदा रकमे पेक्षा ३०% (तीस टक्के) जादाचे (सन-२००७-२००८ चे दरसुची पेक्षा ४.८२ % कमीचे दरास ) मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ. पवार संध्या बाळासाहेब

अनुमोदक :- मा.श्री. शिंदे दशरथ बाबु

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :- १**
सन २००८-२००९

विषय क्रमांक-५ मंगळवार दिनांक८/४/२००८

ठराव क्रमांक -५ मंगळवार दिनांक ८/४/२००८

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेस अंदाजे एक हजार आसन क्षमता- व्यवस्था असलेले अद्यावत सभागृह /नाटयगृह बांधणे कामीचे मंजूर निविदा कार मे. किर्लोस्कर कंन्सलटंट यांचे कडून सकारात्मक प्रतिसाद मिळत नसलेने तांत्रिक सल्लागार म्हणून इतर एजन्सीची नेमणूक करणे विषयी विचार विनिमय करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** विषय- अहमदनगर महानगरपालिकेस अंदाजे १००० आसन क्षमता व्यवस्था असलेले अद्यावत सभागह/ नाटयगृह बांधणे बाबत.

मा.सादर,

उपरोक्त विषयान्वये महानगरपालिकेतर्फे सावेडी मध्ये अंदाजे १००० आसन व्यवस्था असलेले अद्यावत सभागृह / नाटयगृह बांधणेसाठी तांत्रिक सलागार नेमणेसाठी मा.स्थायी समिती ठराव क्र. ४ दि. २६/१०/०७ अन्वये मे. किर्लोस्कर कन्सलटंट यांची निविदा मंजूर झाली. तद्नंतर मे.किर्लोस्कर कन्सलटंट यांना जा.क्र. सा.बां. १६२९ दि. १६/११/०७ अन्वये करारनामा करण्याबाबत चे पत्र पाठविले त्यांच्या कडून योग्य तो प्रतिसाद न मिळाल्याने त्यांना दि. ५/१२/०७ रोजी स्मरण पत्र देण्यात आले तरीही त्यांच्या कडून वेळेत सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही.

तसेच मा. कार्यकारी अभियंता,मा.नगररचनाकार व श्री. लोटके अध्यक्ष नाटय परिषद व इतर नाटय परिषद सदस्य यांनी पुणे, मुंबई येथील विविध नाटयगृहांची पाहणी केली असता मे. किर्लोस्कर कन्सलटंट यांनी तयार केलेल्या आराखडयामध्ये नियोजन, वास्तुरचना व इतर तांत्रिक बाबींची त्रुटी आढळून आल्या महानगरपालिकेच्या अधिकारी व नाटय परिषदेचे सदस्य यांना स्पष्टीकरण के. किर्लोस्कर कंन्सलटंट यांचे प्रतिनिधी यांना देता आले नाही तसेच पुणे, मुंबई येथे ज्या उर्वरित नाटयगृहांची पाहणी करावयाची आहे त्यांचे नियोजन करता आले नाही व त्या बाबत त्यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. करारनामा पुर्ण करणे करिता त्यांना ५/१२/०७ व तेसच ३१/१२/०७ चे फॅक्स करण्यात आला.

तसेच जा.क्र. सा.बां. ३७८७ दिनांक ३१/१/०८ अन्वये मे. किर्लोस्कर कन्सलटंट यांना अतिम नोटीस देण्यात आले नोटीस मध्ये तीन दिवसांची मुदत होती. तद्नंतर जा.क्र. ३८४९ दि. ८/२/०८ अन्वये १०/२/०८ रोजी सकाळी ११.०० वाजता महानगरपालिका शहर अभियंता यांच्या कार्यालयात करारनामा करून घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रासह उपस्थित राहाणे बाबत व त्यामध्ये विलंब झाल्यास आपली कोणतीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही याची कटाक्षाने नोंद घ्यावी असे कळविले.

दिनांक १३/२/०८ रोजी त्यांनी प्रारूप करारनामा महानगरपालिका, शहर अभियंता यांचेकडे दाखल केला त्या मधील असलेले चुका दुरूस्त करून व अटी शर्ती मध्ये बदल करून त्यांना करारनामा पुर्ण करून घेणेकरिता सांगितले. मे. किर्लोस्कर कन्सलटंट यांनी दि. १८/२/०८ रोजी फॅक्स द्वारा महानगरपालिकेस कळविले की, त्यांनी दिलेली मागणी करारनामामधील पा.नं. १३ची कमी न करता तसेच ठेवावी. तसेच पा.नं. १२ वरील मागणी ही दैनंदिन नसून ठराविक कालावधीसाठी आहे. तसेच कामावरील देखरेख ही दररोजची नाही व त्यांचेकडील सुपरवायझर हे पुणे येथे राहून अहमदनगर वरील कामावर देखरेख करतील,मे. किर्लोस्कर कन्सलटंट, पुणे यांचे वरील कामाकरिता कामीत कमी दर हे प्रोजेक्ट किंमतीच्या ३.०० % असे होते ( सर्व्हीस टॅक्स वगळून) परंतु त्यांना काम करण्यात उत्साह दिसून येत नाही. वरील कामासाठी एकूण १० कन्सलटंट यांचे बंद निविदा आले होते. त्यांचा तुलणात्मक तक्ता खालीलप्रमाणे

| अ.नं. | आर्किटेक्ट यांचे नाव | भरलेली टक्केवारी | शेरा |
|---|---|---|---|
| १. | अविष्कार गृप, अहमदनगर | १.७१ %(प्रोजेक्ट किंमतीच्या ) | ऑफर मध्ये ध्वनी यंत्रणा व इले." अॅकॉस्टीक कामाचा समावेश नाही तसेच सर्व्हिस टॅक्सचा उल्लेख नाही " |
| २. | अशोक काळे & असो. अहमदनगर | १.९४ %(प्रोजेक्ट किंमतीच्या ) | सर्व्हिस टॅक्सचा उल्लेख नाही. |
| ३. | कांकरिया & असो. अहमदनगर | २% ( प्रोजेक्ट किंमतीच्या ) | आर.सी.सी. व अॅकॉस्टीक कंन्स.यांच्या चार्जेसचा समावेश नाही तसेच सर्व्हिस टॅक्सचा उल्लेख नाही |
| ४. | संदिप गुरव & असो.पुणे | २.७५%(प्रोजेक्ट किंमतीच्या) + १२.२५ % सर्व्हीस टॅक्स | |
| ५. | शेळके & साळुंके असो. अहमदनगर | २.९० %(प्रोजेक्ट किंमतीच्या ) + १२. % सर्व्हीस टॅक्स | |
| ६. | रितेश कांकरिया, नाशिक | ३. % ( प्रोजेक्ट किंमतीच्या ) | सर्व्हिस टॅक्सचा उल्लेख नाही.(निगोशिएबल ऑफर ) |
| ७. | किर्लोस्कर कन्सलटंट, पुणे | ३.९१%( प्रोजेक्ट किंमतीच्या ) | सर्व्हिस टॅक्स व इतर टॅक्ससह |
| ८. | इम्पॅक्ट डिझाईन गृप, मुंबई | ४ % ( प्रोजेक्ट किंमतीच्या ) | स्टाफचा जाणे-येण्यासह राहणेचा खर्च वेगळा राहिल. |
| ९. | शशी प्रभू & असो. मुंबई | ४ % ( प्रोजेक्ट किंमतीच्या ) | सर्व्हिस टॅक्सचा उल्लेख नाही |
| १० | प्रसाद आर्किटेक्टस &टाउन प्लॅनर, पुणे | ५.२०% (प्रोजेक्ट किंमतीच्या ) | सर्व्हिस टॅक्सचा उल्लेख नाही |

मे.किर्लोस्कर कन्सलटंट यांचे कडून सकारात्मक दृष्टीकोन दिसून येत नाही असे निदर्शनास आले आहे.प्राप्त निविदा पैकी अनुभवी एजन्सी मे. शशी प्रभू अॅन्ड असो. यांचेशी दुरध्वनी वरून संपर्क केला असता सदर कामासाठी त्यांनीही होकार दिला नाही अहमदनगर शहरा बाहेरील एजन्सी च्या बाबतीत दैनंदिन सुपरविजन, बैठकांना उपस्थिती, संपर्क , वेळेवर माहिती उपलब्ध करून देणे अशा बाबतीत तत्परता असणार नाही असे दिसते. त्यामुळे स्थानीक एजंन्सी मधून निवड करावयाची ठरल्यास मे.कांकरिया अॅण्ड असो.यांचे मार्फत महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीचे काम चांगल्या प्रकारे चालू आहे.त्यांची सेवाही वेळेवर उपलब्ध होते.त्यांचा विचार या कामासाठी होणे योग्य वाटते.

मे.कांकरीया अॅण्ड असो.यांनी त्यांचा देकार संपूर्ण सेवेसाठी(आर्किटेक्ट,आर.सी.सी अॅकॉस्टीक इ.२+०.७५= २.७५ %दिलेला आहे.सदर देकार मे. किर्लोस्कर कन्सलटंट,पुणे यांचे मंजूर ३%दरापेक्षा कमी आहे. यामुळे प्रस्ताव अवलोकनार्थ व मा.स्थायी समितीचे मंजूरीस्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे शाखा अभियंता यांचा अहवाल असे.

कार्यकारी अभियंता :- अहवालाप्रमाणे मान्यतेस्तव सादर. दि. ४/३/०८

शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी. :- अवलोकनार्थ व मान्यतेस्तव सादर दि. ४/३/०८

मुख्य लेखाधिकारी श्री. कर्डीले पी.बी.:- बांधकाम विभागाच्या अहवालाप्रमाणे मे. कांकरिया अॅण्ड असो. यांचा प्रस्ताव मान्य करणेस हरकत नाही. मा.स्थायी समितीसमोर निर्णयार्थ ठेवणे योग्य दि. ५/३/०८

मा. उपायुक्त साहेब :- **'अ'** प्रस्तावीत नुसार मान्यतेस्तव मा.स्थाई समिती कडे फेर विचारार्थ निर्णय घेणे करिता पाठवितो साठी मंजूरीस्तव सादर. दि. ११/३/०८

मा.आयुक्त साहेब :- लोएस्ट निविदाकाराशी निगोशिएशन केले का ? चर्चा करावी दि. १७/३/२००८

शहरअभियंता श्री.पालवे व्ही.डी.:-फेर सादर, मा.आयुक्त साहेब यांचेशी दिनांक २४/३/०८ चर्चा झाली

**उपरोक्त निविदेतील कमी दराचे निविदेबाबत व प्रस्तावातील निविदेबाबत मा.स्थायी समितीकडे निर्णयास्तव सादर.**

मुख्य लेखाधिकारी श्री. कर्डीले पी.बी. :- मा.स्थायी समितीच्या निर्णयास्तव ठेवणेस सादर.

मा.उपायुक्त साहेब :- **"अ"**प्रस्तावीत निर्णयाकरिता स्थाई समितीकडे पाठविणेसाठी मंजूरीस्तव सादर दि. २४/३/०८

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि. २४-३-०८

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा .

मा.सभापती साहेबः-सदर बाबतीत अविस्कार ग्रुपचे श्री.मनोजकुमार जाधव यांनी सदर नाटयगृहाचे कामाकरिता नियुक्ती करणे विषयी माझ्याकडेस पत्र दिलेले आहे श्री.कांकरिया इंजि.यांनीही पत्र दिलेले आहे.

शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी. :- आमचे कडेस तसे पत्र आलेले नाही

मा.श्री. तिवारी सु.र. :- प्रशासनाने श्री. कांकरिया इंजि.चे निविदा दरास मंजूरी मिळणे विषयी प्रस्ताव सादर केला आहे. मागील वेळी किर्लोस्कर कंन्सलटंट यांचे निविदा दर जास्त असतांना ही त्यांचे दर मंजूर केले होते. परंतु अविष्कार ग्रुपचे दर कमीचे असूनही त्यांना निगोशिएशन अथवा चर्चे साठी बोलावण्यांत आलेले नव्हते. त्यांचे कमीचे निविदा दर मंजूर करणे आवश्यक होते कमीचे दर असुनही त्यांना डावलेले आहे.

शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी.:- नाटयगृहाचे /सभागृहाचे बांधकामाचा अनुभवा असणा-या फर्मला प्राधान्य दिले होते.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- नाटयगृह म्हणजे नुसती इमारत उभी करणे नव्हे त्यामध्ये तांत्रिक बाबीं पाहुन नाटयगृहाचे बांधकाम करण्याचा अनुभव असलेल्या फर्मची निवड करण्याचे धोरणानुसार किर्लोस्कर कंन्सलटंट यांची निविदा मंजूर केली होती. त्यांना कामाचा अनुभव होता.

मा.श्री.तिवारी सु.र. :- अविष्कार ग्रुपचे श्री. मनोजकुमार जाधव यांना ही अनुभव आहे त्यांची कृषी विद्यापीठाचे आर्किटेक्ट पॅनलवर निवड झालेली आहे.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- सदर चे नाटय गृहाचे कामासाठी कंन्सलटंट इंजि. नेमणे कामी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण दहा निविदा प्राप्त झाल्या होत्या, त्यामध्ये अविष्कार ग्रुपची १-७१ दराची कमीची निविदा प्राप्त झाली होती. परंतु मा.महापौर साहेब याचे दालनात झालेल्या बैठकी मध्ये नाटयगृहाचे बांधकाम करण्याचा अनुभव असलेल्या फर्म ला काम देण्यांचे ठरल्यानुसार पुणे येथील किर्लेस्कर कंन्सलटंट यांचे निविदास मंजूरीची शिफारस देण्यांत आली होती. परंतु त्यांनी अटीनुसार रू.वीस लाखाची मागणी केली असुन त्याचा सकारात्मक प्रतिसाद मिळत नसलेने प्राप्त निविदा पैकी अनुभवी एजन्सी शशी प्रभु ॲण्ड असो. यांचेशी ही संपर्क केला असता त्यांनी ही होकार दिला नसल्याने मा.स्थायी समिती समोर सदर कामच्या निविदा मंजूरी विषयी प्रस्ताव सादर केला आहे.

मा.सभापती साहेबः-त्यांना कामाचा अनुभव होता.म्हणून किर्लोस्कर कंन्सलटंट यांचे३%चे दर मंजूर केले होते.

मा.श्री. तिवारी सु.र. :- अविष्कारची कमी दराची निविदा मंजूर करावी.

मा.श्री. कोतकर भा.ए. :- शेळके ॲण्ड सांळुके फर्मचा अनुभव काय आहे

शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी. :- आपले कडेस त्यांची कामे चालू नाहीत.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- नाटयगृहाच्या इमारतीचे बांधकाम कुनीही करू शकतो परंतु त्या साठी वापरावायाची इक्वालॉजी ट्रीटमेंट जो चांगली करले म्हणजे स्टेज वर बोललेले सभागृहाच्या शेवटच्या रांगेत स्पष्ट ऐैकायला यावयास हवे अशा प्रकारे काम झाले नाही तर मनपावर टिका होउ शकते त्या करिता सदरचे टेक्नीकल काम करणारी चांगली फर्म असावी.

शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी. :- श्री कांकरिया व अविष्कार ग्रुप यांनी नाटयगृह चे बांधकाम केलेले नाही कंन्सलटंट चांगला असेल तर काम चांगले होईल.

मा.श्री. तिवारी सु.र. :- श्री.अशोक काळे हे पण इच्छुक होते. त्यांचेशी ही आपण संपर्क साधलेला नाही अविष्कार ग्रुपची निविदा मंजूर करावी.

मा.आयुक्त श्री.हांगे सोहब :-महाराष्ट्र राज्यामध्ये ज्यांनी नाटयगृहाचे सभागृहाचे काम केलेले आहे.त्यांचे कडून निविदा मागविता येतील रू. ५-७ कोटी ची नुसती इमारत आपणांस बांधावयाची नाही ठेकेदार कुनीही येईल परंतु सुपरविजन चांगले हवे तरच काम चांगले होईल.शॉर्टमुदतीचे टेंडर मागवावे .

मा.सभापती साहेब :- सदर कामामुळे सावेडी भागाचे विकासात भर पडेल.फेरनिविदा मागविल्यास किती वेळ जाईल.

शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी. :- भविष्यातील काही सांगता येणार नाही.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- मा.स्थायी समितीने सर्वानुमते निर्णय घ्यावा.

मा.श्री. कोतकर भा.ए. :- फेर टेंडर मागविल्यास वेळ जाईल.मा.सभापती साहेब, मा.महापौर तसेच स्थायी समिती सदस्य श्री.शिंदे दशरथ,श्री.आरिफ भाई यांनी सर्वांनी मिळून योग्य निर्णय घ्यावा.

मा.श्री. तिवारी सु.र. :- अविष्कार ग्रुपचे श्री. मनोजकुमार जाधव, कांकरिया असो. चे श्री. कांकरिया यांना सभेमध्ये चर्चे साठी बोलवावे.

मा.सभापती साहेब :- त्यांना सभेत बोलवावे

त्या प्रमाणे श्री. मनोजकुमार जाधव, अविष्कार ग्रुप हे सभेत हजर झाले.

मा.श्री. कोतकर भा.ए. :- नगर मधील इंजि. यांचे कडून सदरचे नाटयगृहाचे काम चांगल्या पध्दतीने करून घ्यावयाचे आहे. आपण व कांकरिया इंजि. दोघांनाही काम देण्यांचे ठरवतो आहोत आपले काय मत आहे. एकत्र काम करणार का ?

श्री. मनोजकुमार जाधव :- दोघांमध्ये डिझाईन बाबत स्पर्धा ठेवावी पंधरा दिवसात मी सदर कामाचे नकाशे आपणा कडेस सादर करतो चांगल्या डिझाईनची आपण निवड करावी मला खात्री आहे की माझे डिझाईन आपणांस आवडले नंतर आपण काय ते ठरवावे. कलेक्टर ऑफिस येथील नियोजन भवनाचे काम मी केलेले आहे. त्यामध्ये सभागृहाचे काम ही आहे. दोघांना काम करतांना थिंकीग प्रॉब्लेम येउ शकतो. पुण्याच्या फर्मशी मी सदर कामाचे सहकार्या बाबत विचारणा केलेली आहे.मला स्वतंत्र काम देण्यांत यावे मी ते चांगल्या प्रकारे करील.

शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी.:- कॅाम्पीटीशन मध्ये तिसरा ही येउ शकतो श्री.अशोक काळे यांचेही दर १.८४ असे होते. तेव्हा तिघांची कॅाम्पीटीशन घ्यावी लागेल.

मा.श्री. तिवारी सु.र. :- अविष्कार ग्रुपचे निविदा दर कमीचे आहेत ते मंजूर करावे.

मा.श्री. शिंदे द.बा. :- अविष्कार ग्रुपचे निविदा दर मंजूर करावे.

मा.श्री. शेख आरिफ शे.र. :- मंजूर करावे.

मा.सभापती साहेब :- अविष्कार ग्रुप चे दर सर्वानुमते मंजूर करावे.

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेस अंदाजे एक हजार आसन क्षमता- व्यवस्था असलेले अद्यावत सभागृह /नाटयगृह बांधणे कामीचे मंजूर निविदा कार मे. किर्लोस्कर कंन्सलटंट यांचे कडून सकारात्मक प्रतिसाद मिळत नसलेने तांत्रिक सल्लागार म्हणून इतर एजन्सीची नेमणूक करणे विषयी विचार विनिमय करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**ठराव :-**अहमदनगर महानगरपालिकेस अंदाजे एक हजार आसन क्षमता- व्यवस्था असलेले अद्यावत सभागृह /नाटयगृह बांधणे कामीचे मंजूर निविदा कार मे. किर्लोस्कर कंन्सलटंट यांचे कडून सकारात्मक प्रतिसाद मिळत नसलेने तांत्रिक सल्लागार म्हणून इतर एजन्सीची नेमणूक करणे विषयी प्रशासाने सादर केलेल्या सविस्तर प्रस्तावावर सभेमध्ये झालेल्या सविस्तर चर्चेनुसार पुढील प्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे. अहमदनगर महानगरपालिकेस अंदाजे एक हजार आसन क्षमता व्यवस्था असलेले अद्यावत सभागृह / नाटयगृह बांधणेसाठी सल्लागार म्हणून अविष्कार ग्रुप अहमदनगर यांची नेमणूक करण्यांस तसेच त्यांचे स्पर्धात्मक दृष्टया कमीचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. शिंदे दशरथ बाबु

अनुमोदक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,<br>
स्थायी समिती<br>
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :- १**
सन २००८-२००९

विषय क्रमांक-६ मंगळवार दिनांक ८/४/२००८
ठराव क्रमांक -६ मंगळवार दिनांक ८/४/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दी मध्ये मा.केंद्र शासनाचे अनुदानातून प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम राबविणे ( फेज-२) या योजने अंतर्गत करण्यांत आलेल्या तात्पुरत्या स्वरूपातील नेमणुकांस कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर** :- विषय- आर.सी.एच फेज-२ अंतर्गत कर्मचा-यांची तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने नेमणुकीबाबत.

फेरसादर,

विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ (१) (२) व (३) नुसार आर.सी.एच. फेज-२ अंतर्गत कर्मचा-यांची तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने नेमणुकीबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे मंजुरीस्तव सादर करण्यात आला असता दिनांक १७/३/०८ रोजी मा.सभापती स्थायी समिती, यांनी प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन करून सदर प्रस्तावास मंजुरी गृहीत धरून मान्यता दिलेली आहे. मात्र सदरचे प्रकरण लगतच्या स्थायी समिती पुढे फेर प्रस्तावासह मंजुरी साठी ठेवण्यांत यावे असे आदेश दिलेले आहेत.

त्यानुसार जा.क्र. आस्थापना / कंत्राटी नेमणुक ४३२० दि १८/३/०८ अन्वये संबंधीत कर्मचा-यांची आर.सी.एच. फेज-२ अंतर्गत तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने अटी व शर्ती नुसार दि. १९/३/०८ पासून ६ महिन्याकरिता नियुक्ती करण्यात आलेली आहे.

**तरी उपरोक्त प्रकरणी अंतिम मंजूरी साठीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे मंजूरीस्तव ठेवणेस आदेशार्थ सादर.**

येणे प्रमाणे आस्थापना विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.दि.१८/३/०८

मा.कामगार अधिकारी :- प्रस्तावातील **"अ"** नुसार कार्योत्तर मंजूरीस्तव मा.स्थायी समिती पुढे ठेवणेस मान्यतेस्तव सादर दि. १८/३/०८

मा.उपायुक्त साहेब :- **"अ"** प्रस्तावीत मान्यतेस्तव दि. १९/३/०८

मा. आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि. १९/३/०८

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दी मध्ये मा.केंद्र शासनाचे अनुदानातून प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम राबविणे ( फेज-२) या योजने अंतर्गत करण्यांत आलेल्या तात्पुरत्या स्वरूपातील नेमणुकांस कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- मा.केंद्र शासनाचे आरोग्य कार्यक्रमा अंतर्गत केलेल्या नेमणूकांस कार्योत्तर मंजूर देणेचा प्रस्ताव आहे.

मा.श्री. कोतकर भा.ए.:- कोणत्या नेमणूका आहेत.

सहाय्यक आयुक्त श्री. देशमुख आर.ए. :- मा.केंद्र शासनाचे अनुदानातून प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम राबविणे साठी या संबंधीत कर्मचा-यांच्या नेमणूका केलेल्या आहेत. या नेमणूकास कार्योत्तर मंजूरी मिळणे करिता प्रस्ताव सादर केलेला आहे या कर्मचा-यांच्या नेमणूका सहा महिन्यासाठी ताप्तुरत्या स्वरूपातील आहेत.

मा.श्री. शेख आरिफ शे.र. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा. सौ.पवार सं.बा. :- मंजूर करावा.

मा. सभापती साहेब :- सर्वानुमते ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

**ठराव** :- अहमदनगर महानगरपिालका हद्दीमध्ये मा.केंद्र शासनाचे अनुदानातून प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम राबविणे ( फेज-२) या योजने अंतर्गत करण्यांत आलेल्या तात्पुरत्या स्वरूपातील नेमणूकांस कार्योत्तर मंजूरी देण्यांत येत आहे ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. शेख आफिर शेख रफिउद्दीन

अनुमोदक :- मा.सौ. पवार संध्या बाळासाहेब

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :- १**
सन २००८-२००९

विषय क्रमांक-७ मंगळवार दिनांक ८/४/२००८

ठराव क्रमांक -७ मंगळवार दिनांक ८/४/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक १८ मधील तख्ती दरवाजा ते आझाद चौक ते लक्ष्मीबाई कांरजा, मजुर अडडा ते स्वामी विवेकानंद चौक ते लक्ष्मीबाई कांरजा व दोन बोटी चिरा ते पटवर्धन चौक ते चितळे रोड पर्यतचे रस्त्याचे डांबरीकरण करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर** :- विषय- निविदा मंजुरी बाबत,

कामाचे नांव :- प्रभाग क्रमांक १८ तख्ती दरवाजा मस्जिद ते आझाद चौक ते लक्ष्मीबाई कांरजा व मजुर अडडा ते स्वामी विवेकानंद चौक ते लक्ष्मीबाई कांरजा पर्यत रस्त्याचे डांबरीकरण करणे.

उपरोक्त विषयी खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१) प्रशासकीय मान्यता :- मा.आयुक्त साहेब यांचे कडील दि. ०४/१०/०७ अन्वये कामास मंजुरी
२) प्रशासकीय मान्यता रक्कम रू. :- १८,४९,८०४/-
३) तांत्रिक मान्यता रक्कम रू. :- १८,४९,८०४/-
४) तांत्रिक मान्यतेची दरसुची :- २००७-०८
५) निविदा ( परिशिष्ट 'ब') रक्कम रू. :- १७,६३,२३३/-
६) निविदा प्रसिध्दी तारीख :- ०६/११/२००७
७) निविदा विक्री कालावधी :- ०७/११/०७ ते २३/११/०७ ( पंधरा दिवस)
८) निविदा स्विकारण्याची तारीख :- २७/११/२००७
९) निविदा उघडण्याची तारीख :- ३०/११/२००७
१०) कामाची मुदत :- ६ महिने
११) प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील :-

| **अ.नं.** | **ठेकेदाराचे नांव** | **देकार** |
|---|---|---|
| १ | मे.एस.एस. कन्स्ट्रक्शन, अ.नगर | ४० % जादा |
| २ | मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन कंपनी, अ.नगर | ३६.९९ %जादा |
| ३ | मे.ए.सी कोठारी | ५१.९९ % जादा |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने मे. बेस्ट कन्स्ट्रक्शन कंपनी, अ.नगर यांचा देकार सर्वात कमी म्हणजे ३६.९९ % जादा आहे. सदर दर चालू दरसुचीवर अद्यावत डांबराचे दर धरून सुधारित अंदाजपत्रक तयार केले असता निविदाधारकाची निविदा ही सुधारित अंदाजपत्रकापेक्षा २९.५८% जादा येत आहेत. निविदा धारकांनी निविदे मधील दर कमी करून सदर काम २२.९९ % जादा दराने करण्याचे लेखी पत्र दिले आहे. त्यानुसार निविदा धारकाची निविदा सुधारित अंदाजपत्रका पेक्षा ९.३२ % जादा आहे. दि. १६/२/२००८ रोजी मा. छाननी समिती कडे सदर प्रस्ताव सादर केले असता मा. छाननी समितीने निविदा धारकाची निविदा सुधारित अंदाजपत्रका पेक्षा ९.०० % जादा दराने मंजूर करण्याची शिफारस केली आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | सुधारित देकारानुसार होणारी कामाची किंमत | रू. २१,६८,६००/- |
| २ | चालु दरसुची सन- ०७-०८ अनुसार कामाची अद्यावत किंमत | रू. १९,८३,७५०/- |
| ३ | ठेकेदाराची सुधारित किंमत व कामाची अद्यावत किंमत या मधील फरक (१०-११) | रू. १,८४,८५०/- |
| ४ | चालु दरसुची नुसार अधिक्याची टक्केवारी<br>(१२ x १००)<br>११ | ९.३२ % जादा |
| ५ | शेरा / अभिप्राय | खालील प्रमाणे |

त्यानुसार तुलना करता ठेकेदाराचा देकार ९.३२ % जादा येत आहे. मात्र मा. छाननी समितीने सदरचे काम सुधारित अंदाजपत्रके पेक्षा ९.०० % जादा दराने करण्याची शिफारस केली आहे. या प्रस्तावास मा.स्थायी समितीची मंजुरी आवश्यक आहे तसेच वाढीव खर्च रू. २१,६८,६००/- १८,४९,८०४/-= ३,१८,७९६/- चे खर्चास मंजूरी व तरदुतीसाठी आदेश होणेसाठी प्रस्ताव सादर.

यास्तव प्रस्ताव अवलोकनार्थ तसेच विषय मंजुरीसाठी मा.स्थायी समितीपुढे सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे दि. १९/३/०८

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- वॉर्ड क्रमांक आठरा मधील डांबरी करणाचे निविदा दरास मंजूरी देणे विषयीचा प्रस्ताव आहे.

मा.सौ. खरपुडे ज.सु.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ. पवार सं. बा. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर .

मा.सभापती साहेब :-. सर्वानुमते ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यांत यावा.

**ठराव** :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक १८ मधील तख्ती दरवाजा ते आझाद चौक ते लक्ष्मीबाई कांरजा, मजुर अड्डा ते स्वामी विवेकानंद चौक ते लक्ष्मीबाई कांरजा व दोन बोटी चिरा ते पटवर्धन चौक ते चितळे रोड पर्यतचे रस्त्याचे डांबरीकरण करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तक्ता व ऑफिस रिपोर्ट पहाता छानननी समितीने शिफारस केल्यानुसार कमीचे निविदा दर धारक मे.बेस्ट कन्स्ट्रक्शन कंपनी, अहमदनगर यांचे सुधारित अंदाजपत्रका पेक्षा ९.०० %(नउ टक्के) जादाचे दरास व त्या मुळे येणा-या वाढीव खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ. खरपुडे जयश्री सुरेश

अनुमोदक :- मा.सौ. पवार संध्या बाळासाहेब

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१**

सन २००८-२००९

विषय क्रमांक-८ मंगळवार दिनांक ८/४/२००८

ठराव क्रमांक -८ मंगळवार दिनांक ८/४/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय नागपुर येथे दिनांक ३/६/२००८ ते दिनांक ३१/१०/२००८या कालावधीत होणा-या ४९ व्या डिव्हीजनल ऑफिसर्स कोर्स करिता श्री. शंकर उत्तम मिसाळ यांना पाठविणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर** :-प्रस्तावना-विषय- श्री. शंकर उत्तम मिसाळ, फा.फा. सुपरिटेंडट यांचे राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपुर येथे डिव्हीजनल ऑफिसर कोर्स प्रशिक्षणा बाबत.

राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय नागपुर, येथील डिव्हीजनल ऑफीसर्स पाठयक्रम प्रशिक्षणा बाबत श्री. शंकर उत्तम मिसाळ यांना दिनांक ३/६/२००८ ते ३१/१०/२००८ या कालावधीमध्ये आयोजित होणा-या ४९ वा डिव्हीजनल ऑफीसर्स कोर्स करिता प्रवेश अर्ज व पाठयक्रम खर्चा बाबतचा प्रस्ताव सोबत सादर करणेत येत असुन सदर कालावधीमध्ये उपरोक्त प्रशिक्षणास श्री. शंकर उत्तम मिसाळ यांना पाठविणे बाबतच्या प्रस्तावास मा.आयुक्त साहेब यांनी मंजुरी दिलेली असुन सदर प्रस्तावास मा.स्थायी समितीची मंजुरीस्तव ठेवणेस सविनय सादर.

येणे प्रमाणे आस्थापना प्रमुख श्री. व्ही.एस. थोरात व कामगार अधिकारी यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- डिव्हीजनल ऑफिसर्स कोर्स करिता श्री. मिसाळ शंकर उत्तम यांना पाठविणेस मंजूरी देणेचा विषय आहे.

मा.श्री. शेख आरिफ शे.र. :-ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. शिंदे द.बा. :- मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करणेत यावा.

**ठराव :-** राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय नागपुर येथे दिनांक ३/६/२००८ ते दिनांक ३१/१०/२००८या कालावधीत होणा-या ४९ व्या डिव्हीजनल ऑफिसर्स कोर्स करिता श्री. शंकर उत्तम मिसाळ यांना पाठविणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन.

अनुमोदक :- मा.श्री. शिंदे दशरथ बाबु.

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१**

सन २००८-२००९

विषय क्रमांक-९ मंगळवार दिनांक ८/४/२००८

ठराव क्रमांक -९ मंगळवार दिनांक ८/४/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ७ मधील मिलींद कॉलनी मुळे कॉलनी रो. हौसिंग मधील श्री. धनगुडे घर ते श्री. गव्हारे घर ते मोकाळे घर ते शेख घर, गव्हारे घर ते कुलकर्णी घरापर्यत रस्ता डांबरीकरण करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तक्ता व त्या वरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर** :- प्रस्तावना-विषय-निविदा मंजुरी बाबत.

कामाचे नांव :- मिलींद कॉलनी, मुळे कॉलनी रो.हौ. मध्ये धनगुडे घर ते गव्हारे घर ते मोकाळे घर ते शेख घर, गव्हारे घर ते कुलकर्णी घरापर्यत रस्ता डांबरीकरण करणे.

महोदय,

उपरोक्त विषयी खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

प्रशासकीय मान्यता :- मा.आयुक्त साहेब यांचे कडील दि. २०/१२/०७अन्वये कामास मंजुरी

प्रशासकीय मान्यता रक्कम रू. :- ९,३१,९८५/-

तांत्रिक मान्यता रक्कम रू. :- ९,३१,९८५/-

तांत्रिक मान्यतेची दरसुची :- सन-०७-०८

निविदा ( परिशिष्ट 'ब') रक्कम रू. :- ८,८६,९५०/-

निविदा प्रसिध्दी तारीख :- १३/१/०८

निविदा विक्री कालावधी :- १४/१/०८ ते २९/१/०८ ( १५ दिवस)

निविदा स्विकारण्याची तारीख :- ४/२/०८

निविदा उघडण्याची तारीख :- ६/२/०८

कामाची मुदत :- ४महिने

प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील खालीलप्रमाणे

| **अ.नं.** | **ठेकेदाराचे नांव** | **देकार** |
|---|---|---|
| १ | मे.ए.सी. कोठारी, अ.नगर | २८.०० % जादा |
| २ | श्री. ए.पी. सोनीमंडलेचा, अ.नगर | ३५.०० %जादा |
| ३ | श्री. पटेल नितीन, अ.नगर | ३५ % जादा |
| ४ | श्री. आर.डी. गवळी, .अ.नगर | ४०.०० %जादा |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने मे.ए.सी. कोठारी, अ.नगर यांचा देकार सर्वात कमी म्हणजे निविदा रकमेपेक्षा २८ % जादा आहे. सदर प्रस्ताव मा. छाननी समिती समोर दिनांक ४/३/२००८ रोजी ठेवला असता सदर काम मे.ए.सी. कोठारी,अ.नगर यांना निविदा दरापेक्षा १७% जादा दराने देणेची शिफारस करण्यात आली व ठेकेदार तयार आहे.

| | | |
|---|---|---|
| १२ | सुधारित देकारानुसार येणारी किंमत | रू.१०,३७,७३१.५०/- |
| १३ | चालु दरसुची सा.बां.सन- ०७-०८ अनुसार कामाची अद्यावत किंमत | रू. ९,३८,३५५/- |
| १४ | ठेकेदाराची सुधारित किंमत व कामाची अद्यावत किंमत या मधील फरक | रू. ९९,३७६.५०/- |
| १५ | चालु दरसुची नुसार अधिक्याची टक्केवारी (१२ x १००)<br>११ | ९.५८ % जादा |
| १६ | शेरा / अभिप्राय | खालील प्रमाणे |

सदर निविदा सन ०७-०८ चे दरसुचीच्या तुलनेत ९.५८ % जादा दराची आहे. तरी सदरची निविदा अवलोकनार्थ व मंजुरीस्तव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस्तव सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- प्रभाग क्रमांक ७ मधील डांबरीकरणाचे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दरास मंजूरी देणेचा प्रस्ताव आहे.

मा.श्री. शेख आरिफ शे.र. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा

मा.सौ. दिघे वि.रा. :- मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार कमीचे दर सर्वानुमते मंजूर.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ७ मधील मिलींद कॉलनी, मुळे कॉलनी रो. हौसिंग मधील श्री. धनगुडे घर ते श्री. गव्हारे घर ते मोकाळे घर ते शेख घर, गव्हारे घर ते कुलकर्णी घरापर्यत रस्ता डांबरीकरण करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तक्ता व ऑफिस रिपोर्ट पहाता छाननी समितीने शिफारस केल्यानुसार कमीचे निविदा दरधारक मे.ए.सी. कोठारी, अहमदनगर यांचे निविदा दरापेक्षा १७%(सतरा टक्के)(सन २००७-०८चे दरसुची च्या तुलणेत ९.५८%जादाचे) जादाचे दरास व त्यामुळे येणा-या वाढीव खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन

अनुमोदक :- मा.सौ. दिघे विमल रामचंद्र

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,
स्थायी समिती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१**
सन २००८-२००९

विषय क्रमांक-१० मंगळवार दिनांक ८/४/२००८

ठराव क्रमांक -१० मंगळवार दिनांक ८/४/२००८

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र.८आयोध्यानगर ताराबाग कॉलनी, अमितनगर कॉलनी व एकता कॉलनी अंतर्गत ४५० व ३०० एम.एम. व्यासाचे ड्रेनेज लाईन टाकणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तक्ता व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** प्रस्तावना-विषय-निविदा मंजुरी बाबत.

कामाचे नांव :- प्र.क्र.८ मध्ये अयोध्यानगर, ताराबाग कॉलनी अमितनगर व एकता कॉलनी अंतर्गत ४५०व ३०० एम.एम. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे.

उपरोक्त विषयी खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१) प्रशासकीय मान्यता :- मा.आयुक्त साहेब यांचे कडील दि. २६/१०/०७अन्वये कामास मंजुरी
२) प्रशासकीय मान्यता रक्कम रू. :- ३२,९८,५४९/-
३) तांत्रिक मान्यता रक्कम रू. :- ३२,७४,५९६/-
४) तांत्रिक मान्यतेची दरसुची :- सन-०६-०७
५) निविदा ( परिशिष्ट 'ब') रक्कम रू. :- ३१,१८,६६३/-
६) निविदा प्रसिध्दी तारीख :- १३/१/०८
७) निविदा विक्री कालावधी :- १४/१/०८ ते २९/१/०८ ( १५ दिवस)
८) निविदा स्विकारण्याची तारीख :- ४/२/०८
९) निविदा उघडण्याची तारीख :- ६/२/०८
१०) कामाची मुदत :- ८ महिने
११) प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील खालीलप्रमाणे

| **अ.नं.** | **ठेकेदाराचे नांव** | **देकार** |
|---|---|---|
| १ | कुशल कंस्ट्रक्शन, अ.नगर | २८.०० % जादा |
| २. | आर.आर. कपुर, अ.नगर | २९.०० %जादा |
| ३ | जाधव आर.व्ही. | ३१.०० % जादा |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने श्री. कुशल कंस्ट्रक्शन, अ.नगर यांचा देकार सर्वात कमी म्हणजे निविदा रकमेपेक्षा २८ % जादा आहे. सदर प्रस्ताव छाननी समिती समोर दिनांक ४/३/२००८ रोजी ठेवला असता सदर काम श्री. कुशल कंस्ट्रक्शन, अ.नगर यांना निविदा दरापेक्षा २८% जादा दराने देणेची शिफारस करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| १२ | सुधारित देकारानुसार येणारी किंमत | रू.३९,९१,८८८.६४/- |
| १३ | चालु दरसुची सा.बां.सन- ०७-०८ अनुसार कामाची अद्यावत किंमत | रू. ३७,१२,६८३/- |
| १४ | ठेकेदाराची सुधारित किंमत व कामाची अद्यावत किंमत या मधील फरक | रू. २,७९,२०६/- |
| १५ | चालु दरसुची नुसार अधिक्याची टक्केवारी (१२ x १००) ११ | ६.९९ % जादा |
| १६ | शेरा / अभिप्राय | खालील प्रमाणे |

सदर निविदा सन ०७-०८ चे दरसुचीच्या तुलनेत ६.९९ % जादा दराची आहे. तरी निविदा मंजुरीस्तव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस्तव मान्यतेस्तव सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- प्रभाग क्रमांक ८ मधील ड्रेनेज लाईन टाकणेचे कामी आलेल्या कमीचे निविदा दरास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.सौ. खरपुडे ज.सु.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ. दिघे वि.रा. :- मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र.८आयोध्यानगर ताराबाग कॉलनी, अमितनगर कॉलनी व एकता कॉलनी अंतर्गत ४५० व ३०० एम.एम. व्यासाचे ड्रेनेज लाईन टाकणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तक्ता व ऑफिस रिपोर्ट पहाता छाननी समितीने शिफारस केल्यानुसार कमीचे निविदा दर धारक श्री. कुशल कंन्स्ट्रक्शन, अहमदनगर यांचे निविदा रकमेपेक्षा २८% ( अठ्ठावीस टक्के) ( सन २००७-२००८ चे दरसुचीच्या तुलनेत ६.९९ %जादाचे ) जादाचे दरास व त्यामुळे येणा-या वाढीव खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ. खरपुडे जयश्री सुरेश.

अनुमोदक :- मा.सौ. दिघे विमल रामचंद्र.

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१**
सन २००८-२००९

विषय क्रमांक-११ मंगळवार दिनांक ८/४/२००८

ठराव क्रमांक -११ मंगळवार दिनांक ८/४/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे एकात्मीक शहर विकास योजने अंतर्गत नगररचना योजना क्रमांक ४अं.भू.क्र.२६२ मिस्कीन मळा सावेडी येथे बागीचा विकसीत करणे कामी चे मंजूर निविदाकार श्री.ए.सी.शेख यांनी सदर काम करणेस असमर्थता दर्शविल्याने दुस-या क्रमांकाचे निविदाकार श्री. ए.सी.कोठारी यांचा देकार मान्य करणे विषयी ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर** :- प्रस्तावना-विषय-ए.श.वि.यो. अंतर्गत न.र.यो.क्र.४ अं.भू.क्र. २६२ मिस्कीन मळा सावेडी येथे बगीचा विकासीत करणे.

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट देण्यांत येतो की,मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.८ दि. ७/१/२००८ च्या मा.स्थायी समिती मध्ये ए.सी.शेख यांची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.५०% जादा दराने मंजूर करण्यांत आलेली आहे.

त्यानुसार उपरोक्त कामांची सुरक्षा ठेव २.५० % रक्कम रूपये २,४८,६४९/-,शासकीय विमा १% रूपये ९९,९५०/- व रूपये ६०,४६०/- किंमतीच्या स्टँपपेपरवर करारनामा ३ दिवसाच्या आत करून द्यावा व विषयांकित कामाचा कार्यांरभ आदेश घेण्याबाबतची कार्यवाही करावी अन्यथा ३ दिवसांनंतर आपण इच्छुक नाही असे गृहीत धरून आपली अनामत रक्कम जप्त करून निविदा रद्द करण्याची प्रक्रिया हाती घेण्यात येईल. अशा आशयाचे पत्र ए.सी. शेख यांना जा.क्र. ३६८६ दि.२१/१/२००८ अन्वये दिले होते. पंरतु संबंधीत ठेकेदाराने सदरच्या पत्रान्वये पैसे भरून करारनामा करून कार्यारंभ आदेश घेण्याबाबतची कार्यवाही केलेली नाही.

तरी आज दि. ३/३/२००८ रोजी ए.सी. शेख पत्र देवून सदरचे काम करणेस इच्छुक नसल्याचे इकडेस कळविले आहे. सदर ठेकेदाराने भरलेल्या दराची मुदत निविदा शर्त ब-१ नुसार ९० दिवस आहे. सदर निविदा मंजुरीचा प्रस्ताव प्रथम दि. ३/९/२००७ रोजी सादर करण्यात आल होता. मा.स्थायी समितीकडून त्यास अंतीम मंजूरी दि. ७/१/०८ रोजी मिळाली. यामध्ये ४ महिन्यांपेक्षा जादा कालावधी गेला आहे. एकूण निविदा उघडून ७ महिन्यांपेक्षा जादा कालावधी झालेला आहे. त्यामुळे निविदेतील शर्तीचा आधार घेत ठेकेदाराने दिलेल्या दरामध्ये काम करण्यास असमर्थता दर्शविलेली आहे. यानंतर दोन पर्याय दिसतात. फेरनिविदा किंवा दुस-या क्रमांकाच्या निविदा धारकास वाटाघाटीसाठी बोलविणे काम लवकर सुरू व्हावे या दृष्टीने दुस-या पर्यायाचा विचार करण्यात यावा असे वाटते.

ठेकेदाराने जास्त कालावधी झाल्याचे कारण देवून निविदा प्रक्रिया करण्याचे नाकारले आहे. त्यामुळे लघुत्तम दराची निविदा प्रक्रिया पुर्ण होवू शकत नाही. महाराष्ट्र नगर परिषद लेखासंहिता १९७१,३०नोव्हेंबर १९८२ पर्यतची सुधारीत आवृत्ती नियम १७१मुद्दा क्रमांक (२)पा.क्र.८६ अन्वये नंतरच्या ठेकेदारास वाटाघाटीस बोलविता येवू शकते. अशा आशयचा प्रस्ताव सादर केला असता त्यावर मा. मुख्यलेखाधिकारी, महानगरपालिका अहमदनगर यांनी निविदा उघडून ९० दिवसांपेक्षा अधिक कालवधी झाला असल्याने व निविदेतील दर कालबाहय झाले असल्याने ठेकेदाराने काम करण्यास नकार दिला आहे. लेखासंहिता १९७१ मधल नियम क्र. १७१(२) मधील तरतूदीन्वये जेंव्हा लघुत्तम दराची निविदा नाकारली जाईल तेंव्हा त्यानंतरची सर्वात लघुत्तम दराची दुसरी निविदा नाकारण्यास पुरेशी कारणे नमुद करणे शक्य नसल्यास तर ती स्विकारणेत यावी असे स्पष्ट नमुद केले आहे. कामाला विलंब होवू नये ही बाब विचारात घेता दुस-या ठेकेदारास वाटाघाटीसाठी बोलाविणे योग्य वाटते असे म्हटले.

त्यानंतर मा.उपायुक्त ( सा.) साहेब यांनी प्रस्तावीत नुसार दुसरे कमी दराचे ठेकेदारास वाटाघाटीस तात्काळ बोलावून वाटाघाटी करावी. त्यांचा देकार वाजवी असल्यास नियमानुसार करारनामा व कार्यादेश देण्याची रितसर कार्यवाही करावी नसल्यास फेरनिविदा तात्काळ मागविणेची कार्यवाही करणेत यावी असे मत दिले असता मा. आयुक्त यांनी त्यास दिनांक १७/३/२००८ रोजी मान्यता दिलेली आहे.

त्यावर प्रस्ताव फेरसादर मागील टिप्पणी प्रमाणे दुस-या क्रमांकाचे ठेकेदार मे.ए.सी.कोठारी यांना वाटाघाटीसाठी पत्र दिले असता त्यांनी त्यांचा अंतीम देकार २३.२९% जादा दिलेला आहे व निर्णयासाठी दि. ३०/४/०८ मुदत दिलेली आहे (पत्र क्र.२४/३/०८) त्या अनुषंगाने चालू दरसुची म्हणजे सन २००७-०८ अन्वये ठेकेदाराचा देकार निविदा दरापेक्षा ९.२९ % इतका जादा येत आहे. यापूर्वी मंजूर झालेली निविदा २३.५% जादा दराचे होती. तरी सदर काम लवकर सुरू करण्याच्या दृष्टीने उपरोक्त निविदा देकार अवलोकनार्थ व मा.स्थायी समितीचे मंजूरीस्तव पाठविणेसाठी प्रस्ताव सादर केला असता मा.आयुक्त साहेब यांनी त्यास दि.२७/३/२००८ रोजी मान्यता देवून या अगोदरील चुकीची कार्यपध्दती करणा-यावर कार्यवाही करावी असे नमूद केले आहे.

तरी अंतिम मान्यतेसाठी प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे व पुढील निर्णयास्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- मंजूर ठेकेदार श्री. शेख यांनी मिस्कीन मळयाचे बगीच्याचे काम करणार नसल्याचे सांगितल्याने दूसरे निविदाकाराचे दर मंजूरीचा प्रस्ताव आहे.

मा.श्री. शिंदे द.बा. :- काम लवकर सुरू करण्याचे दृष्टीने प्रस्ताव मंजूर करावा.

मा.श्री. शेख आरिफ शे.र. :- मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार मे.ए.सी. कोठारी यांचे दरास सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे एकात्मीक शहर विकास योजने अंतर्गत नगररचना योजना क्रमांक ४ अं.भू.क्र. २६२ मिस्कीन मळा सावेडी येथे बागीचा विकासीत करणे कामी चे मंजूर निविदाकार श्री.ए.सी. शेख यांनी सदर काम करणेस असमर्थता दर्शविल्याने दुस-या क्रमांकाचे निविदाकार श्री. ए.सी.कोठारी यांचा अंतीम देकार सन २००७-२००८ दरसुची नुसार निविदा रकमे पेक्षा ९.२९ % ( नउत्र पूर्णाक एकोणतीस शतांश टक्के) जादाचे दरास व त्यामुळे येणा-या वाढीव खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. शिंदे दशरथ बाबु.

अनुमोदक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन.

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१**

सन २००८-२००९

विषय क्रमांक-१२ मंगळवार दिनांक ८/४/२००८

ठराव क्रमांक -१२ मंगळवार दिनांक ८/४/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. २१ मधील शहाजी रोड वरील टायटन शोरूम ते श्री.अ.म.रासने दुकान ते श्री. सुवालाल गुंदेचा घरापर्यत १२०० एम.एम. व्यासाची आर.सी.सी पाईप गटर करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तक्ता व त्या वरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तवाचा मजकुर :-** विषय-निविदा मंजूरी बाबत.

कामाचे नाव :- प्र.क्र.२१ शहाजी रोड वरील टायटन शो रूम ते अ.म.रासने दुकान ते सुवालाल गुंदेचा घरापर्यत १२०० एम.एम. व्यासाची आर.सी.सी. पाईप गटर करणे.

महोदय,

उपरोक्त विषयी खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

प्रशासकीय मान्यता :- मा.आयुक्त साहेब यांचे कडील दि. १६/५/०७ ची प्रशासकीय मंजूरी

प्रशासकीय मान्यता रक्कम रू. :- ११,६८,२७१/-

तांत्रिक मान्यता रक्कम रू. :- ११,६८,२७१/-

तांत्रिक मान्यतेची दरसुची :- सन- २००६-२००७ ( म.जि.प्रा.)

निविदा ( परिशिष्ट 'ब') रक्कम रू. :- ११,५३,५४२/-

निविदा प्रसिध्द तारीख :- दि. ६/११/०७ ( फेर निविदा क्र.२)

निविदा विक्री कालावधी :- दि. ७/११/०७ ते १६/११/०७

निविदा स्विकारण्याची तारीख :- १९/११/०७

निविदा उघडण्याची तारीख :- ३०/११/०७

कामाची मुदत :- ६ महिने

प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील ङ

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | देकार |
|---|---|---|
| १ | श्री. हर्षद शिंदे ,अ.नगर | ५१.५० % जादा |
| २ | श्र विजय म्हस्के | ४९.५० %जादा |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता श्री. विजय म्हस्के यांचा देकार सर्वात कमी म्हणजे निविदा रकमेपेक्षा ४९.५० % जादा आहे. उपरोक्त लघुत्तम निविदा दराची सन २००७-२००८ चे जिल्हा दरसचुी नुसार केलेल्या सुधारीत अंदाजपत्रकापेक्षा २५.८३ १७% जादा आहे. सदर दर अवाजवी असल्याने सर्वात कमी निविदाधारकास वाटाघाटीसाटी बोलाविणे योग्य होईल. तरी आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.

शहर अभियंता :- वाटाघाटीसाठी बोलविणे दि. २२/१/०८

मा. फेरसादर,

प्रस्तुत कामाचे ठेकेदार श्री. विजय म्हस्के यांची सर्वात कमी मात्र निविदा रकमेपेक्षा ४९.५० % जादा दराची निविदा सुधारित अंदाजपत्रकापेक्षा २५.८३ % जादा दराची व अवाजवी असलेने त्यांना मा.उपायुक्त (सा) यांचे कार्यालयात वाटाघाटीसाठी समक्ष बोलविले असता श्री. म्हस्के यांनी निविदेमध्ये दिलेले दर कमी करून पूर्वीचे दराऐवजी निविदेपेक्षा ४७% जादा दराने काम करणेस तयार असलेबाबत दि २/२/०८ चे पत्राने कळविले आहे. सदरचे दर हे सुधारित दरापेक्षा २३.७३ % जादा आहेत.

**सदरचे दर अवाजवी असलेने फेर वाटाघाटीस बोलविणे अथवा फेर जाहिर निविदा मागविणे योग्य आदेशार्थ सादर.दि. १६/२/०८**

येणे प्रमाणे शाखा अभियंता यांचा अहवाल फेरसादर असे.

कार्यकारी अभियंता :- **' अ'** अहवालाप्रमाणे निर्णयास्तव सादर. दि. २१/२/०८

शहर अभियंता :-सदर ठेकेदारास पुन्हा वाटाघाटीसाठी बोलविले असता. दर कमी करण्यास नकार दिला आहे. सदर ठिकाणी काम करण्यास खालील अडचणी आहेत.

१] बाजार पेठेतील वाहतुक वर्दळीचा रस्ता

२] Material Store करण्यासाठी पुरेशी जागा नाही.

३] स्टीलचे भाव मोठया प्रमाणात वाढले आहेत. ( पर्यायाने पाईपचे भाव वाढले.)

अवलोकनार्थ व छाननी समिती समोर ठेवणेस सादर.दि. ३१/३/०८

मु.ले.परिक्षक :- मान्यतेस्तव सादर.

मुख्य लेखाधिकारी :- अहवालाप्रमाणे मान्यतेस्तव सादर. दि. ३१/३/०८

मा.उपायुक्त साहेब :-छाननी समिती समोर निर्णयासाठी ठेवणे दि. ३१/३/०८

सदर घासगल्ली वॉर्ड क्र.२१ मधील बंद पाईप गटर चे काम हाती घेण्यास आज पावेतो तीन वेळा जाहिर निविदा मागविल्या नंतर दोन वेळा एक ही निविदा प्राप्त झाली नाही. तिस-यांदा जाहीर प्रसिध्दी दिली असता दोन निविदा प्राप्त झाल्या असुन सदर पैकी कमी दराची निविदा विजय म्हस्के (सुशिक्षित बेरोजगार) यांची अंदाजपत्रकापेक्षा ४७.५० % जास्तीची आहे. सदर निविदा दराची तुलना चालू DSR शी केली असता २३.७३% अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्तीची आहे.

सदरचे काम करून घेणे अत्यावश्यक आहे . मात्र सदर रस्ता बाजार पेठेतील असुन वाहतुक दलदलीची आहे. त्यामुळे Material साठवणे साठी पुरेशी जागा उपलब्ध नाही त्यामुळे दुर कोठे तरी Material Store करावे लागणार आहे. तसेच Steelचे भाव अचानक वाढल्याने पाईपचा दर देखील वाढला आहे.

वरील सर्व वस्तु स्थिती विचारात घेता सदर काम करून घेणे गरजेचे असल्याने स्थाई समिती कडे वस्तुस्थिती विचारात घेउन अंतीम निर्णय घेणे साठी पाठविणे करिता मंजूरीस्तव सादर. दि. ३/४/२००८

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. २१ मधील शहाजी रोड वरील टायटन शोरूम ते श्री.अ.म.रासने दुकान ते श्री. सुवालाल गुंदेचा घरापर्यत १२०० एम.एम. व्यासाची आर.सी.सी पाईप गटर करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तक्ता व त्या वरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- प्रभाग क्रमांक २१ मधील शहाजी रोड वरील आर.सी.सी पाईप गटर करणेचे कामाचे दर मंजूरीचा प्रस्ताव आहे.

मा.श्री. कोतकर भा.ए. :- किती रकमेचे काम आहे. काय दर आले आहेत.

शहर अभियंता श्री.पालवे व्ही.डी. :-सदरचे कामाचे रक्कम रू.११,६८,२७१/-खर्चास प्रशासकीय मान्यता मिळालेली असून तीन वेळा जाहिर निविदा मागविल्या आहेत. श्री.विजय म्हस्के यांचे ४७.५०% जादाचे दर आहेत चालू डि.एस.आर शी तुलणा करता ती २३.७३ % जास्तीची आहे.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- तेथे कामाचे मटेरिअल स्टोअर करण्यांस जागा नाही. रस्ता बाजर पेठेतील असून वाहतुकीचा आहे सदर गटरचे काम करणे अडचणीचे असून मटेरिअल लांब दुसरी कडे स्टोअर करून ठेवावे लागेल सदरचे काम करणे आवश्यक आहे.

मा.श्री. तिवारी सु.र.:- सदरचे काम दोन वर्षापासून रखडलेले आहे. काम लवकर करण्यासं सांगावे.तातडीने कार्यवाही करावी.

मा.सौ. दिघे वि. रा. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ. पवार सं.बा. :- मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- सर्वानुमते ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

**ठराव** :-अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. २१ मधील शहाजी रोड वरील टायटन शोरूम ते श्री.अ.म.रासने दुकान ते श्री. सुवालाल गुंदेचा घरापर्यत १२०० एम.एम. व्यासाची आर.सी.सी पाईप गटर करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तक्ता व ऑफिस रिपोर्ट पहाता स्पर्धात्मक दृष्टया कमीचे निविदा दरधारक श्री. विजय म्हस्के, अहमदनगर यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४७.५०% जादाचे ( चालु डि एस आर दरापेक्षा २३.७३ % जादा) चे दरास व त्यामुळे येणा-या वाढीव खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ. दिघे विमल रामचंद्र.

नुमोदक :- मा.सौ. पवार संध्या बाळासाहेब.

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१**
सन २००८-२००९

विषय क्रमांक-१३ मंगळवार दिनांक ८/४/२००८
ठराव क्रमांक -१३ मंगळवार दिनांक ८/४/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील व्यापारी, मद्य विक्रेत, मोबाईल शॉपीज, महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ, महाराष्ट्र परिवहन मंडळ, मोटार एजन्सीज इत्यादींचे आयात मालचे जकाती बाबत चालू खाते ( करंट अकौंट) उघडणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** विषय-म.न.पा. हद्दीतील व्यापारी,मद्य विक्रेते, मोबाईल शॉपीज, महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ, महाराष्ट्र परिवहन मंडळ, मोटार एजन्सीज आदींचे आयात मालाचे जकातीबाबत जकात चालू खाते उघडणे बाबत.

टिप्पणी

अ.नगर महानगरपालिकेने दि १/४/०८ पासून म.न.पा. कर्मचा-यांमार्फत जकात वसुली सुरू केलेली आहे. म.न.पा. हद्दीतील व्यापारी, मद्य विक्रेते, मोबाईल शॉपीज, महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ, महाराष्ट्र परिवहन मंडळ, मोटार एजन्सीज आदीनी आयात मालाचे जकातीबाबत जकात चालू खाते उघडण्यासाठी अर्ज दिले आहेत.

जकात नियम २००५ मधील कलम २१ अन्वये चालू खाते ठेवण्याच्या अधिकाराबाबत तरतूद नमुद आहे. सदर तरतुदी नुसार म.न.पा जकाती बाबत चालू खाते ठेवणेसाठी मा.आयुक्त साहेब यांनी ठरवुन देण्यात येईल अशी रक्कम अनामत घेउन चालू खाते उघडण्यास मा.स्थायी समितीकडेचे मंजूरीस्तव पाठविणे बाबत निर्देश दिलेले आहेत.

वरील व्यापारी वर्गांचे चालू खाते उघडल्यास जकातीचे कामात सुसुत्रता येउन काम सुरळीतपणे करण्यास मदत होईल , तरी सदर कामी मा.स्थायी समितीची मंजूरी मिळावी ही विनंती.

येणे प्रमाणे टिप्पणी असे.

येणे प्रमाणे जकात अधिक्षक यांचा अहवाल असे. दि.३/४/०८
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील व्यापारी, मद्य विक्रेत, मोबाईल शॉपीज, महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ, महाराष्ट्र परिवहन मंडळ, मोटार एजन्सीज इत्यादींचे आयात मालचे जकाती बाबत चालू खाते ( करंट अकौंट) उघडणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा .

मा.सभापती साहेब :- एम.एस. सी.बी,एस.टी महामंडळ, व्यापारी इत्यादीचे जकातीचे चालू खाते ठेवणेस मंजूरी देणे विषयीचा प्रस्ताव आहे.

मा.श्री. कोतकर भा.ए. :- जकातीचे खाते उघडणे चा विषय काय आहे.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेने दिनांक १/४/२००८ पासून जकात वसुली सुरू केलेली आहे. म.न.पा. हद्दीतील व्यापारी, मद्य विक्रेत, महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ, महाराष्ट्र परिवहन मंडळ, मोटार एजन्सी आदीनी आयात मालचे जकाती बाबत चालू खाते उघडण्यासाठी अर्ज दिलेले आहेत. त्यांचे जकातीचा आयात माल आल्या नंतर जकात विभागा कडेस त्याची नोंद नोदंवितात व ते त्यांचे खात्या मधून हिशोबानुसार जकात भरतात त्यासाठी त्याचे जकातीचे खाते उघडयास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव मंजूरी साठी सादर केलेला आहे.

मा.श्री. कोतकर भा.ए. :- नियमानुसाराच आहे ना?

अं.ले.परिक्षक श्री. गोरे पी.आर. :-पूर्वी पासूनची पध्दत आहे. हे जकतीचे पैसे अशा खात्यावर ठेवतात व संबंधीत हिशोब नुसार जकात भरतात.

मा.श्री. शिंदे द.बा. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. शेख आरिफ शे.र . :- मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील व्यापारी, मद्य विक्रेत, मोबाईल शॉपीज, महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ, महाराष्ट्र परिवहन मंडळ, मोटार एजन्सीज इत्यादीचे आयात मालचे जकाती बाबत चालू खाते ( करंट अकौंट) उघडण्यास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. शिंदे दशरथ बाबु.

अनुमोदक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन.

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,<br>
स्थायी समिती<br>
अहमदनगर महानगरपालिका